मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे,
जा.क्र. अशाद/ ४३६२
दिनांक :- ११/०२/२०२२.

मा. प्राचार्य,
विद्या भवन हायस्कूल,
शिवाजीनगर, पुणे.

यांसकडेस

**विषय:- विद्या भवन हायस्कूल, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे येथील शाळेच्या इमारतीकरिता प्राथमिक ना हरकत दाखला मिळणेबाबत.**

संदर्भ :मा.प्राचार्य,विद्या भवन हायस्कूल,पुणे यांचा दि.२४.१२.२१रोजीचा अर्ज

महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत पत्रास अनुसरून, विषयांकित प्रकरणी सदरील जागेची आग प्रतिबंधक दृष्टीने पाहणी केली असता, खालील बाबी आढळून आलेल्या आहेत.

१) सदरची जागा मुख्य रस्त्यालगत आहे
२) इमारतीचे बांधकाम आर.आर.सी.मध्ये असून, इमारत तळमजला + तीन मजले आहे.
३) सदर ठिकाणी इमारतीमध्ये शाळा असून, त्यामध्ये क्लास रूम, सायन्स लब, ग्रथालय, जिम, ऑफिस आहे.
४) सदर जागेतील इलेक्ट्रिकल वायरिंग केपिग केसिंग व कॉन्डूप पाईपमध्ये आहे.
५) आग प्रतिबंधक दृष्टीने सदर जागेत ०९ नग एबीसी टाईप फायर एक्स्टिंग्वीशर्स, ०६ कि.ग्र. क्षमतेचे ठेवण्यात आलेले असून एबीसी टाईप फायर एक्स्टिंग्वीशर्स, ०६ कि.ग्र. क्षमतेचे १० नग ठेवण्यात यावेत. तसेच आत्यंतिक प्रसंगी त्याचा योग्य प्रकारे वापर करून प्राथमिक स्वरूपातील आग विझविण्याचे ज्ञान तेथील कर्मचार्यांना असावे.
६) सदर इमारतीस स्थायी अग्निशमन यंत्रणा त्यामध्ये होज पाईपची गुडाळी, वेट रायजर २, फायर अलार्म सिस्टीम बसविण्यात यावी. इमारतीस स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आल्यानतर फॉर्म अ अग्निशमन दलाकडे सादर करावा.
७) गच्चीवरील पाण्याची टाकी १५००० लिटर क्षमतेची बसविण्यात यावी. टाकीच्या पातळीवर किमान ०.३ एन / एम एम२ इतका दाब ९०० एलपीएमचा इलेस्टीकल पम्प बसविण्यात यावा.
८) सदर ठिकाणी इमारतीस जिने वापरात आहेत.
९) सदर शाळेमध्ये जळाऊ पदार्थाचा साठा करू नये.
१०) सदर शाळेकरिता पुणे मनपा बाधकाम विभागाचा परवाना घेण्यात यावा.
११) सदर ठिकाणी आत्यंतिक प्रसंगी कामगारांना बाहेर पडण्यास व्यवस्थित मार्ग असावे.
१२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम २००६ च्या अटीचे पालन करावे.
१३) फायर माक ड्रिल प्रत्येक सहा महिन्यातून एकदा आयोजित करावी.
१४) सदर ना हरकत दाखला हा आग प्रतिबंधक दृष्टीने देण्यात आलेला आहे.
१५) सदरचा प्राथमिक ना हरकत दाखला आग प्रतिबंधक उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने १ वर्षासाठी ग्राह्य धरण्यात येईल. आग प्रतिबंधक दृष्टीने उपाययोजना केल्यानंतर अंतिम ना हरकत दाखला घेण्यात यावा.

तरी वरील बाबींचा विचार करता, विषयांकित शाळेकरिता अग्निशामक दलाचा प्राथमिक ना हरकत दाखला देणेत येत आहे.

प्रमोद रा. सोनावणे ११/०२
स्टेशन डयुटी ऑफिसर,
अग्निशामक दल, पुणे म.न.पा.

Scanned with CamScanner